# गोऱ्या सैतानाचे शिक्षेचे प्रकार

पहिली आवृत्ती

संकलक
चंद्रकांत शहासने
(देशभक्तकोशकार)
मो.क्र. - ९८८१३७३५८५

कर्नाळा चारिटॅबल ट्रस्ट, पुणेच्या सौजन्याने

पुस्तकाचे नाव : गोऱ्या सैतानाचे शिक्षेचे प्रकार

संकलक : चंद्रकांत शहासने (देशभक्तकोशकार) पुणे
मो.क्र. – ९८८१३ ७३५८५

प्रकाशक : बहुजन साहित्यधारा, पुणे
११ ए, राहुल कॉम्प्लेक्स,
चौथा मजला, पौड रोड, पुणे.
दुरध्वनी : ९८८१३७३५८५
हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

प्रकाशन दिनांक : २५ डिसेंबर २०२२ पहिली आवृत्ती

मुद्रक : श्री वेंकटेश पब्लिकेशन, पुणे
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड. मो. क्र. ८२३७८ ९३३४७

कर्नाळा चारिटेबल ट्रस्टच्या राष्ट्रभक्ती प्रसार अभियानांतर्गत ही पुस्तिका बहुजन साहित्यधारा पुणे प्रकाशनाने प्रकाशित केली

मूल्य : रूपये ३०/–

संपर्क : श्री. हेमंत प्रभाकर आळवे
मो. : ९३२२२६९७२१
श्री. अशोक जनार्दन फडणीस, मेणोली
९८५०५ ०९४१६

शालेय वितरणासाठी सवलतीने उपलब्ध.






# गोऱ्या सैतानाची कृष्णकृत्ये

**इंग्रजांचे भारतावर राज्य होते तेव्हाही आपल्या उच्चभ्रू समाजातील बरीच मंडळी इंग्रजांकडे आदराने पहात होती. त्यांचे विचार, त्यांची भाषा, त्यांचा वेश आत्मसात करण्यासाठी धडपडत होती. जर या देशाचे, धर्माचे आणि संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी, क्रांतिवीरांनी आत्मयज्ञ केला नसता तर, आम्ही एव्हाना आमचे भारतीयत्व विसरलोही असतो. केवळ या देशाचे रक्षण करण्यासाठी आम्हाला सुधारण्यासाठी देवानेच धाडलेल्या इंग्रजांनी केलेल्या रानटी अत्याचारांच्या वर्णनांवरूनच त्यांच्या खऱ्या स्वरूपाची कल्पना येते.**

**बाह्यतः सभ्य दिसणारा हा गोरा इंग्रज अंतर्यामी सैतानालाही लाजवेल असा परमसैतान होता. चांद मासिकाच्या १९२८ सालच्या अंकावरून, त्याला स्वतंत्र भाषेचा साज चढवून हा खास लिहिलेला लेख आहे.**

१८५७ च्या बंडानंतर इंग्रज सैनिकांनी व अधिकाऱ्यांनी निरपराध स्त्रियांवर, आबालवृद्धांवर जे नृशंस अत्याचार केले, ते पाहून सैतानाची मानदेखील शरमेने झुकली असेल. एखादी व्यक्ती भारतीय आहे एवढेच कारण तिच्या हत्येला पुरेसे ठरत होते. गोळ्या घालून माणसे उडविणे हे या इंग्रजांचे करमणुकीचे साधन बनले होते. यासंबंधीचे वेगवेळ्या लेखकांचे, अधिकाऱ्यांचे वृत्तांत वाचताना अंगावर काटा उभा राहतो. स्वातंत्र्य संग्रामातील हे हजारो हुतात्मे अनामिक राहिले तरी त्यांचे बलिदान व्यर्थ गेले नाही; भारत स्वतंत्र झाला. आज आपण जे स्वातंत्र्य उपभोगत आहोत त्याची किंमत बलिदानाची ही गाथा वाचल्यानंतर नक्कीच कळून येईल.

**चार्लस बॉल –**
**(''इंडियन म्युटिनी'',**
**खंड एक पृ. २४३–२४४ :)**

**बॉल – एक इंग्रज अधिकारी पत्रात लिहितो:–**

**गावकऱ्यांना जाळून मारले**

''बरेच गावकरी असलेल्या एका मोठ्या गावाला आम्ही आग लावून दिली. आगीतून जीव वाचवण्यासाठी ते बाहेर धावत येत तेव्हा आम्ही त्यांना गोळ्या घालत असू.''

**इतिहासकार सर जॉन के ''हिस्टरी ऑफ – दि सिपॉय वॉर'', खंड दोनः**

**निर्दोष भारतीयांची हत्या**

''सैनिक आणि बिगरसैनिकदेखील रक्तलांछित न्यायालये भरवत होते किंवा कोणत्याही न्यायनिवाड्याविना स्त्री-पुरुषांची, बाल-तरुण-वृद्धांची सरसकट हत्या करत होते. भारतीय रक्ताची त्यांची ही तहान नंतर आणखीच वाढली.'' भारताच्या गव्हर्नर जनरलने पाठवलेल्या कागदपत्रांत नमूद करून ठेवलेले आहे की, ''बंडखोरांप्रमाणेच म्हाताऱ्या स्त्रिया व बालकांना बळी देण्यात आले आहे. त्यांना मुद्दामच फासावर लटकवण्यात आले नाही तर त्यांच्या त्यांच्या गावात त्यांना जाळून मारण्यात आले.'' अधूनमधून त्यांना गोळ्याही घालण्यात येत. काळ्यांवर गोळ्या झाडणे ही फार मजेशीर व आनंददायक करमणूक होती.

अशी प्रौढी मारण्यात किंवा असे मोठ्या फुशारकीने लिहून ठेवण्यात इंग्रजांना अजिबात दिक्कत वाटत नव्हती. सरकारने प्रसिद्ध केलेल्या एका पुस्तकात म्हटले आहे की, ''प्रेते वाहून नेणाऱ्या आठ गाड्या सतत तीन महिने सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत चौरस्त्यांवर आणि बाजारांमध्ये टांगलेली प्रेते उतरवण्यासाठी फिरत होत्या.'' अशा प्रकारे सहा हजार मनुष्यप्राण्यांचा झटपट निकाल लावून त्यांना परलोकात रवाना करण्यात आले होते.

''....एखाद्या मिस्टर चेंबर्सचे किंवा मिस जेनिंग्जचे काळ्या धटिंगणाने शिरकाण केले असे वाचताना इंग्रज मनुष्य सात्त्विक संतापाने पेटून उठतो. परंतु भारताच्या इतिहासात किंवा नेटिवांमध्ये इतिहास लिहिण्याची पद्धत नसल्यामुळे







त्यांच्या कथांमध्ये व परंपरागत वृत्तांतामध्ये आपल्याविरुद्ध अशीच नोंद राहील की ज्यांची नावे फारशी माहीतही नाहीत अशा माता, पत्नी आणि मुले इंग्रजांच्या सुडाच्या पहिल्या हल्ल्याचे दुर्दैवी बळी झाले....''.

**चार्लस बॉल – ''इंडियन म्युटिनी'' पृ. २५७३**

**एक इंग्रज अधिकारी अलाहाबादमधील आपल्या एक दिवसाच्या कृत्यांबद्दल लिहितो:–**

**गावासहित गावकऱ्यांना जाळले**

''एका फेरीत तर मी खूपच मजा लुटली. आम्ही एक तोफ घेऊन बोटीवर चढलो आणि शीख व गोरे शिपाई शहराकडे गेले. बोट पुढे जात होती आणि आम्ही डावीकडे उजवीकडे गोळे फेकत होतो. असे करता करता शेवटी आम्ही वाईट गावांपर्यंत गेलो. तिथे काठावर जाऊन आम्ही गोळीबार सुरू केला.

माझ्या जुन्या दुनाळी बंदुकीने अनेक काळ्यांना पाडले. सुडाच्या भावनेने मी इतका पेटलो होतो की सटासट गोळ्या झाडत होतो. त्यामुळे ठिकठिकाणी आग लागून ज्वाळा आकाशापर्यंत जाऊ लागल्या. वाऱ्यामुळे आग अधिकच भडकू लागली. या देशद्रोही हरामखोरांचा बदला घेण्याचा हाच दिवस होता. आम्ही दररोजच बेईमान गावकऱ्यांना जाळण्याच्या व त्यांचा विनाश करण्याच्या कामगिरीवर जात होतो. आम्ही आमचा बदला घेतला आहे... . या लोकांचे प्राण आमच्या हातात आहेत आणि आम्ही त्यांना सोडणार नाही याची खात्री बाळगा. शिक्षा झालेल्या अपराध्याला आम्ही एका गाडीवर, त्याच्या गळ्याभोवती दोर बांधून झाडाखाली उभे करतो आणि गाडी बाजूला गेली की तो लटकू लागतो.''

**इतिहासकार होम्स ''सिपॉय वॉर'', पृ. २२९– २३०:**

**असहाय व्यक्तींची हत्या**

''वृद्धांनी तर आमचे काहीच नुकसान केले नव्हते. अगदी दुष्टात दुष्ट पुरुषांवर घेतला तेवढाच सूड आम्ही, आपल्या तान्हुल्याला कवटाळलेल्या अगतिक स्त्रियांवर घेतला.''

**एडवर्ड थॉम्पसन यांच्या ''दि अदर साईड ऑफ दि मेडल'' (पृ. ८१) यामध्ये बंडाच्या वेळेचे प्रोव्हिजनल सिव्हिल कमिशनर सर जॉर्ज कॅम्पबेल यांचे लिखाण उद्धृत केलेले आहे. ते पुढीलप्रमाणे:–**

''....आणि अलाहाबादमध्ये दोन वेळा सरसकट कत्तल करण्यात आली हे मला माहीत आहे


..... आणि त्यानंतर नीलने कत्तलीपेक्षाही भयानक गोष्टी केल्या, त्याने लोकांना जाणीवपूर्वक हालहाल करून मारले, अशा प्रकारची कृत्ये नेटिव्हांनीही कधी केलेली नाहीत.''

**''नरेटिव्ह ऑफ दि इंडियन रिव्होल्ट'', पृ. ३६:**

**तोफेच्या तोंडी दिले**







''इतरांनी धडा घ्यावा म्हणून ५५ व्या पलटणीच्या कैद्यांच्या बाबतीत अधिक भयानक गोष्ट करण्यात आली. त्यांची चौकशी होऊन त्यांना शिक्षा झाली आणि त्यांच्यातील प्रत्येक तिसरा कैदी तोफेच्या तोंडी देण्यासाठी निवडण्यात आला.''

कैद्यांना तोफेच्या तोंडी देण्याच्या वेळी हजर असलेल्या एका इंग्रज अधिकाऱ्याने लिहिलेला वृत्तांत ''नॅरेटिव्ह ऑफ दि इंडियन रिव्होल्ट'' यातील पृष्ठ ३६ वर आहे:–

''...त्या दिवशीची परेड विचित्रच होती. परेडमध्ये सुमारे नऊ हजार शिपाई होते. चौकाच्या तीन बाजूंना सैनिक उभे होते तर चौथ्या बाजूला दहा तोफा उभ्या केलेल्या होत्या.

.... नंतर पहिल्या दहा कैद्यांना तोफांच्या तोंडावर बांधण्यात आले. तोफखान्याच्या अंमलदाराने तलवारीने इशारा केला तोफा धडाडल्यानंतर पसरलेल्या धुरातून सर्व दिशांना उडणारे हात, पाय आणि मस्तके दिसत होती. असा प्रकार चार वेळा झाला. प्रत्येक वेळी सैन्यातून भीती प्रगट करणाऱ्या

कुजबुजीचा नाद उठत होता. या प्रसंगानंतर आम्ही आठवडयातून एकदा वा दोनदा मृत्यु-दंडाची परेड पाहिली आहे. आणि त्या दृश्याची सवय झाल्यामुळे त्याबद्दल आम्हाला काहीच वाटेनासे झाले आहे.''

सर चार्लस डिल्क याने आपल्या ग्रेटर ब्रिटन या पुस्तकात, जनरल हेवलॉक आणि रिनोंड यांच्या आधिपत्याखाली कंपनी सरकारचे सैन्य १८५७ मध्ये अलाहाबादहून कानपूरवर चालून गेले त्याबद्दल लिहिले आहे:-

''....१८५७ मध्ये मायदेशी पोचलेल्या पत्रात, कानपूरवर चालून गेलेल्या सैन्याबरोबर असलेला एक उच्चपदस्थ अधिकारी म्हणतो, ''आज बऱ्याच बंडखोरांचा खातमा केला.'' इथे एक लक्षात घेतले पाहिजे की, अशा प्रकारे फासावर लटकवलेले किंवा तोफेच्या तोंडी दिलेले 'बंडखोर' म्हणजे कोणी सशस्त्र बंडखोर नव्हते तर संशयावरून पकडलेले साधे गावकरी होते. या सैन्याने जे अत्याचार केले, गावे जाळली, निरपराध रहिवाशांची कत्तल केली ते पाहून खुद्द महम्मद तुघलकानेही खाली मान घातली असती.''

**सतीचौरा घाटावरील हत्याकांड**

२६ जून १८५७ रोजी किल्ल्यातील सर्व इंग्रज नानाला शरण गेले. किल्ला, तोफखाना आणि किल्ल्यातील जवळ जवळ सगळी हत्यारे आणि खजिना नानाच्या स्वाधीन करण्यात आला. सर्व इंग्रजांना पुरेसे शिधापाणी देऊन होड्यांतून अलाहाबादला पाठवण्यात येईल असे आश्वासन नानाने दिले.

त्या रात्री चाळीस होड्यांची व्यवस्था करण्यात आली. होड्यांमध्ये शिधासामग्री ठेवण्यात आली. २७ तारखेला पहाटे इंग्रजांचा झेंडा उतरवून किल्ल्यावर बादशहा बहादुरशहाचा झेंडा फडकवण्यात आला. सर्व इंग्रजांना हत्तीवरून आणि पालख्यांमधून किल्ल्यापासून दीड मैल अंतरावर असलेल्या








सतीचौरा घाटावर पोचवण्यात आले.

परंतु जनरल नीलच्या शिपायांनी ज्यांने घरदार, नातेवाईक आणि मुलाबाळांना जाळून खाक केले होते अशी असंख्य माणसे दरम्यानच्या काळात अलाहाबाद आणि त्याच्या आसपासच्या भागातून येऊन कानपुरात जमा होऊ लागली होती. या लोकांनी सांगितलेला वृत्तांत आणि कंपनी सरकारच्या सैन्याने अलाहाबादेत केलेले अत्याचार ऐकून ऐकून कानपुरातील जनतेचा व तेथील देशी शिपायांचा संताप अनावर होत होता. असे म्हणतात की क्रोधाने भडकलेल्या शिपायांपैकी कोणा एकाने प्रथम कर्नल ईवर्टस्वर हल्ला केला आणि ताबडतोब कापाकापी सुरू झाली. नानाला ही बातमी समजताच त्याने लागलीच हुकूम पाठवला की ''इंग्रज पुरुषांना मारा पण स्त्रिया- मुलांच्या केसालाही धक्का लागता कामा नये.'' नानाने असा हुकूम दिला हे जवळ जवळ सर्व इंग्रज इतिहासकारांनी मान्य केलेले आहे.




**फॉरेस्टचे स्टेट पेपर्स आणि के व मॅलिसन यांचे ''इंडियन म्युटिनी'', खंड दोन, पृ. २६३**

नानासाहेबांचा हुकूम मिळताच १२५ इंग्रज स्त्रिया व मुलांना कैद करून सौदाकोठीला नेण्यात आले. इंग्रज पुरुषांना सतीचौरा घाटावर एका ओळीत उभे करण्यात आले. त्यांच्यापैकी एकाने तो बहुधा पाद्री होता, विनंती केली की मरण्यापूर्वी त्याला स्वतः साठी आणि त्याच्या बांधवांसाठी परमेश्वराची प्रार्थना करण्याची परवानगी मिळावी. त्याला परवानगी देण्यात आली आणि त्याची प्रार्थना झाल्यावर हिंदुस्थानी शिपायांनी तलवारीने इंग्रज कैद्यांचा शिरच्छेद केला. या कैद्यांपैकी केवळ चारजण होडीत बसून पळाले. अशा रीतीने ७ जूनला कानपूरमध्ये असलेल्या १००० इंग्रजांपैकी ४ पुरुष त्यांच्या स्वतःच्या प्रयत्नांमुळे व १२५ स्त्रिया व मुले नानासाहेबांच्या औदार्यामुळे २७ जूनला जिवंत राहिले.

१८५७ मध्ये दिल्लीचा पाडाव झाल्यानंतर कंपनी सरकारच्या सैन्याने







दिल्लीमध्ये जे अत्याचार केले त्यांच्याबद्दल लॉर्ड एल्फिन्स्टननी लॉर्ड जॉन लॉरेन्सला लिहिले आहे की :-

''दिल्लीत घातलेला वेढा उठवल्यानंतर आपल्या सैन्याने जे अत्याचार केले ते अतिशय हृदयद्रावक आहेत. मित्र वा शत्रू असा काहीही फरक न करता सरसकट बदला घेतला जात आहे. लुटालुटीबद्दल सांगायचे तर आपण नादिरशहालाही मागे टाकले आहे.'' (लाईफ ऑफ लॉर्ड लॉरेन्स, ७ खंड दोन, पृ. २६२)

**मॉन्टगोमेरी मार्टिन यांचे बॉम्बे टेलिग्राफमधील पत्र :-**

''शहरात प्रवेश केल्यानंतर शहराच्या भिंतीच्या आत जे रहिवासी सापडले त्या सर्वांना आपल्या सैन्याने बायोनेटे खुपसून तेथल्या तेथे मारून टाकले. एकेका घरात चाळीस पन्नासजण लपलेले होते, यावरून या रहिवाशांची संख्या किती मोठी होती याचा आपल्याला अंदाज येईल. हे बंडखोर नव्हते तर शहरवासी होते आणि आपल्या सुविख्यात सौम्य व क्षमाशील धोरणावर त्यांचा

विश्वास होता. त्यांचा गैरसमज दूर झाला याबद्दल मला आनंद वाटतो.''

**इतिहासकार के याने उद्धृत केलेले, ''चॅप्लेन्स नरेटिव्ह ऑफ दि सीज ऑफ देहली'' :–**

''दिल्लीच्या रहिवाशांच्या सरसकट कत्तलीबद्दल उघडउघड घोषणा करण्यात आली. तथापि, त्यांच्यापैकी बरेच जण आमचे हितचिंतक होते हे सर्वश्रुत होते.''

''रसेलची डायरी''' खंड दोन, पृ. ४३३

''मुसलमानांची हत्या करण्यापूर्वी त्यांना डुकराच्या चामड्यात शिवून टाकले जाई, त्याच्या अंगाला डुकराची चरबी फासण्यात येई आणि मग त्यांचे देह जाळून टाकले जात आणि हिंदूना स्वतःला भ्रष्ट करण्यास भाग पाडले जाई...''

इंग्रजांच्या न्यायप्रियतेचा आणि सुशिक्षितपणाचा डंका सर्व जगभर वाजतो. त्यांची विज्ञानप्रियता आणि आधुनिकपणा यांच्या मोहापायी त्या काळातदेखील भारतीय त्यांच्या पोषाखाचे, विचारांचे अनुकरण करण्यात स्वतःला धन्य समजत. परंतु, वर्णद्वेषापायी त्यांनी सैतानालाही लाज वाटावी अशी जी क्रूर कृत्ये केलीत, त्याविषयीची इंग्रज इतिहासकारांनीच केलेली वर्णने वाचताना, माणुसकीला काळिमा लावणाऱ्या या कृत्यांमुळे अंगावर शहारे उभे राहतात, आणि 'नरेचि केला हीन किती नर' या उक्तीची सार्थकता पटते.

**ज्योत्स्ना बोर्डे**

*******





# चित्रे लावून १६ पेजेस करणे